# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/03/2024 (बुधवार) दुपार


### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
### वाहनासह एकुण ६०३०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
### नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक ०६/०३/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे अरोली परिसरात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा धर्मापुरी शिवारातील सुर नदी वरील संगम घाटामधुन विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा विश्वसनीय खबरेवरून विशेष पथक पोलीस स्टॉफ मिळालेल्या खबरेच्या ठिकाणी मौजा धर्मापुरी मशानघाट मधुन सुर नदीवरील संगम घाटावर गेले असता घटनास्थळी रेती भरलेला निळया रंगाचा ट्रॅक्टर क्र. MH 40 CH 7738 व ट्रॉली क्र. MH 40 CH 0859 मिळुन आला त्यावर चालकास त्यांचे नाव गाव व पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव **१) दिनेश बबलु मलाये, वय २३ वर्ष, रा. श्रीखंडा पोस्ट मोरगांव ता. मौदा जि. नागपुर** असे सांगितले. त्यास वाहतुकीचा परवाना विचारले असता रेतीचा कोणत्याही प्रकारचा परवाना नसल्याचे सांगीतले वरून, सदर ट्रॅक्टरची पाहणी केली असता सदर टॅक्टर क्र. MH 40 CH 7738 व ट्रॉली क्र. MH 40 CH 0859 कि. ६,००,०००/—रू. व त्यामध्ये असलेली अंदाजे ०१ ब्रास रेती किंमती ३०००/—रू. चा माल असा एकुण ०६०३०००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने त्यास ट्रॅक्टर ट्रॉली व रेतीबाबत विचारपुस केली असता त्याने सदर ट्रॅक्टर ट्रॉली हि प्रविण भिवगडे रा. धर्मापुरी ता. मौदा जि. नागपुर याच्या मालकीचे असुन त्याचे सांगण्यावरून सुर नदीवरील संगम घाटातुन रेतीची चोरी करून वाहतुक करीत असल्याचे सांगितले. **आरोपी नामे— १) दिनेश बबलु मलाये, वय २३ वर्ष, रा. श्रीखंडा पोस्ट मोरगांव ता. मौदा जि. नागपुर २) प्रविण भिवगडे रा. धर्मापुरी ता. मौदा जि. नागपुर** यांचेविरुद्ध पोस्टे अरोली येथे कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, पोलीस हवालदार हरीदास चाचरकर, पोलीस अंमलदार गोरखनाथ निंबार्ते विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.

# कोळसा चोरी करणारे आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

पोस्टे कन्हान :– अंतर्गत खंदान नं. ३ कन्हान ता. पारशिवनी येथे दिनांक ०५/०३/२०२४ चे १६.३० वा. ते १७.०० वा. पर्यंत नमुद **आरोपी नामे– १) अमिन अशरफ सय्यद २) योगेश हिरदेश प्रजापति दोन्ही रा. शिवनगर कांन्दी वार्ड क्र. ४ कन्हान** यांनी संगणमत करून खदान नं ३ न्यु संबेरीया येथुन त्यांचे कडील मोटरसायकलवर ६ बोरी कोळसा चोरून नेतानी मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन कोळसा किंमती ३०००/– रू. व मोटरसायकल किंमती ३५,०००/–रू. असा एकुण ३८,०००/– रू. चा मुददेमाल मिळुन आल्याने सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी फराज अहमद इस्तेखार अहमद वय २४ वर्षे रा. डब्लु सि.एल सेक्युरिटी गार्ड रा. जे एन रोड वारीसपुरा कामठी ता. कामठी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे कलम ३७९, ३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक महेश बिसने, मो. नं. ९५५२१४२४५४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर